PDF Compressor Free Version


# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,

10/2, स्टार्की टाऊन, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर 440001
दूरध्वनी क्रमांक 0712-2978844
E-mail ID : mahaecotourism@mahaforest.gov.in


इ-मेलद्वारे

क्रमांक : व्यसं/मनिपविमं-सभा/प्र.क्र.121-(4)/22-23/ 804 दिनांक : 15/02/2023

प्रति,

1. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
2. प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी (महाकॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
3. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
4. व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि.नागपूर तथा सदस्य कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी.
5. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),महाराष्ट्र राज्य,नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
6. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती.
7. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
8. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी .

विषय : महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक 02/02/2023 रोजी आयोजित 17 व्या सभेच्या कार्यवृत्तांता बाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्रमांक-कक्ष:6/लले/व्यसं2/4-भाग/कासभा/2-23/733 दिनांक:02023/02/1

PDF Compressor Free Version

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची 17 वी सभा, मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 02/02/2023 रोजी दुपारी 03.00 वाजता "कमांड कंट्रोल रुम", वनभवन, नागपूर येथे संपन्न झाली. सदर सभेचा कार्यवृत्तांत सोबत माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र:- वरील प्रमाणे.**

**सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा**
**व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर**

**प्रतिलिपी :** संचालक, चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर यांना वरील प्रमाणे सहपत्रासह माहितीस्तव सादर.

**प्रतिलिपी :** मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर/ कोल्हापूर/ पुणे यांना वरील प्रमाणे सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

**प्रतिलिपी :** उप सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस अग्रेषित.

**प्रतिलिपी :** वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर यांना वरील प्रमाणे सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

**प्रतिलिपी :** वनसंरक्षक (प्रा.), धुळे यांना वरील प्रमाणे सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

**प्रतिलिपी :** उपवनसंरक्षक (वजी), ठाणे यांना वरील प्रमाणे सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

**प्रतिलिपी :** उपवनसंरक्षक, ब्रम्हपुरी वनविभाग, ब्रम्हपुरी/ मध्य चांदा विभाग, चंद्रपूर/ सोलापूर वनविभाग, सोलापूर/ कोल्हापूर यांना वरील प्रमाणे सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

**प्रतिलिपी :** विभागीय वन अधिकारी (प्रा.), कोल्हापूर/ रत्नागिरी (चिपळूण) यांना वरील प्रमाणे सहपत्रासह माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

**सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा**
**व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर**

**प्रत :-** कक्ष-2, योजना, मनिपविमं यांना सहपत्रासह माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

PDF Compressor Free Version

प्रारुप

# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या सभेचा कार्यवृतांत

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची १७ वी सभा दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचे अध्यक्षतेखाली **"कमांड कंट्रोल रूम"** वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली. सभेत उपस्थित कार्यकारी समिती सदस्य व आमंत्रित अधिकाऱ्यांची यादी (परिशिष्ट १) नुसार सोबत जोडली आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य - सचिव यांनी **सतराव्या सभेच्या** सुरुवातीस अध्यक्षांचे व उपस्थित सर्व सदस्यांचे व इतर अधिकाऱ्यांचे स्वागत केले व त्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने विषयसुचीनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

सभेमध्ये सर्व विषयावर सविस्तर चर्चा होऊन कार्यकारी समितीद्वारे खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

सादरीकरण संबंधित मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक/उपवनसंरक्षक/विभागीय वनाधिकारी यांनी केले.

सर्व मंजूर प्रस्तावांना पुढील सर्वसाधारण अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूरी प्रदान केलेली आहे.

(१) वन संवर्धन कायदा, १९८०, भारतीय वन अधिनियम, १९२७ व वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ मधील तरतुदींचे कोठल्याही प्रकारे उल्लंघन होणार नाही.

(२) महाराष्ट्र राज्य वन पर्यटन धोरण व वन पर्यटनासंबंधी वेळोवेळी शासनाने निर्गमीत केलेले शासन निर्णय/ सूचनांच्या विपरीत कामे करता येणार नाही.

(३) प्रत्यक्ष कामे ही मंजूर आराखड्यानुसारच होतील. कामाचे प्रकार किंवा स्वरुप किंवा नवीन कामे घ्यावयाची असल्यास सुधारीत आराखडा महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचेकडून मंजूर झालेनंतरच पुढील कार्यवाही करावी.

(४) प्राचीन ऐतिहासीक स्मारके उदा. गड/ किल्ले आदी यांचेशी संबंधित निसर्ग पर्यटनाची कामे करण्यापूर्वी संबंधित पुरातत्व विभागाची परवानगी प्राप्त करावी. अशी कामे ऐतिहासीक स्मारकाशी समरस होणारी असावीत याकरीता आवश्यक तांत्रीक मार्गदर्शन त्यांचे कार्यालयातील तज्ञांकडून घ्यावे.

| विषय क्रमांक | विषय | समितीचे निर्णय |
|---|---|---|
| १ | दिनांक ०३/०९/२०२२ रोजी झालेल्या १६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे. | यासंबंधी सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते कार्यवृत्तांत कायम करण्यात आला. |
| २ | निसर्ग पर्यटन विकास आराखड्यांना मान्यता देणे. | |

PDF Compressor Free Version

| | | |
|---|---|---|
| [illegible] | **[illegible] चंद्रपूर वनवृत्त सुधारीत आराखडा**<br>यासंबंधी श्रीमती श्वेता, उप वनसंरक्षक यांनी सादरीकरण केले, प्रकल्पातील कामे रु. १६८.०० कोटीची असुन जवळपास रु. १००,०० कोटींचो कामे झाल्याचे व रु. ६८.०० कोटींची उर्वरीत कामे शिल्लक असल्याचे सांगितले. | बाब निहाय सादरीकरण अपेक्षित न केल्यामुळे सदर प्रस्ताव तूर्त स्थगीत करुन ३ ते ४ दिवसात पुन्हा सादरीकरण करण्याच्या सूचना केल्या. |
| २.२ | **घोडाझरी अभयारण्य, निसर्ग पर्यटन विकास, ब्रम्हपुरी, चंद्रपूर वनवृत्त**<br>आराखडा किंमत रु.१९५९.०५ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२४-२५<br>यामध्ये पर्यटकांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. सदर कामाकरीता चालूवर्षी ७-८ कोटींची आवश्यकता असल्याचे नमूद करण्यात आले. | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन समितीद्वारे सदर **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली**, तसेच तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेसह परिपूर्ण निधी मागणी प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना दिल्या. |
| २.३ | **जॉगर्स पार्क, वन अकादमी, चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर**<br>आराखडा किंमत रु.३०३०.०० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२३-२४<br>फेज - १ लॅंडस्केप, हार्डस्केप अॅण्ड वॉटर स्टोरेज, जॉगिंग ट्रॅक व पायवाट, खेळाचे मैदान, कॅफेटेरीया व ज्युस / कॉफी व फेज – २ वॉटर बॉडीज अॅण्ड स्ट्रीम, योगा अॅण्ड झुंबा सेंटर, पॅगोडा सेंटर अॅण्ड वॉच टॉवर्स, मोगली डेन, एनर्जी पार्क, यास ऑक्सीजन पार्क असे नाव देण्यात येणार आहे व हा २.९ हे. राखीव वन क्षेत्रात उभारण्यात येणार आहे. | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन तसेच अॅडव्हेंचर स्पोर्टमध्ये भाग घेणाऱ्यांचे सुरक्षेकरीता आवश्यक तो उपाययोजना करावी व महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाची परवानगी आवश्यक असल्यास प्राप्त करुन घ्यावी. वन संवर्धन कायदा, १९८० अंतर्गत रितसर परवानगी घेवूनच काम सुरु करावे या सूचनेसह **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.४ | **मगर सफारी, निसर्ग पर्यटन विकास, चिपळून, कोल्हापूर वनवृत्त**<br>आराखडा किंमत रु.५७.८५ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ (१ वर्ष)<br>या स्थळा सभोवती अनेक गड असल्याने नैसर्गिक विविधता असल्याने विकास करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांकरीता निसर्ग वाचनालय, वाहतुक खर्च, प्रशिक्षण साहित्य, तज्ञाचे मानधन इ. चा समावेश आहे. | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन व निधी डीपीडीसी कडुन उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |

PDF Compressor Free Version

| | | |
|---|---|---|
| २.[illegible] | [illegible] निसर्ग पर्यटन विकास, चिपळून, **कोल्हापूर वनवृत्त**<br>आराखडा किंमत रु.१२४.९५ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ (१ वर्ष)<br>यामध्ये विद्यार्थ्यांकरीता निसर्ग वाचनालय, वाहतूक खर्च, प्रशिक्षण साहित्य, तज्ञाचे मानधन इ. चा समावेश आहे. | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन व निधी डीपीडीसी कडून उपलब्ध करुन घेणे या अटीवर **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.६ | **किल्ले भुदरगड, ता. भुदरगड निसर्ग पर्यटन विकास, कोल्हापूर वनवृत्त**<br>आराखडा किंमत रु.२०७.३१ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२४-२५<br>यामध्ये प्रवेशद्वार, फुलपाखरु उद्यान, बालोद्यान, रस्त्याच्या दुतर्फा उंच झाडांची लागवड, पर्यटकांकरीता सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. यावर्षी ८० लाख निधीची आवश्यकता आहे. | आराखडयातील प्रस्तावीत कामांना राज्य पुरातत्व विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याचे व उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहून **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.७ | **मौजे दोनवडे नितवडे धबधबा ता. भुदरगड निसर्ग पर्यटन विकास, कोल्हापूर वनवृत्त**<br>आराखडा किंमत रु.९५०.२८ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२४-२५<br>यामध्ये पर्यटकांना सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. चालु वर्षी १ कोटी निधीची आवश्यकता असल्याचे सांगितले. | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** तसेच तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेसह परिपूर्ण निधी मागणी प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. |
| २.८ | **राधानगरी (दाजीपूर) अभयारण्य, निसर्ग पर्यटन विकास, सहयाद्री कोल्हापूर सुधारीत आराखडा**<br>आराखडा किंमत रु.४५०.०० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२५-२६<br>सन २०२१-२२ ते २०२५-२६ करीता रक्कम रु. ७५० लक्षचा आराखडा सादर करण्यात आलेला आहे. | Meadow Development व Water holes ची कामे वगळता उर्वरीत **रु.४५०.०० लक्षचे** आराखडयास उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहून **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.९ | **कर्नाळा पक्षी अभयारण्य, निसर्ग पर्यटन विकास, वन्यजीव ठाणे, मुंबई सुधारीत आराखडा**<br>आराखडा किंमत रु.११९९.०० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२४-२५ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहून **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.१० | **फणसाड अभयारण्य निसर्ग पर्यटन विकास, वन्यजीव ठाणे, मुंबई सुधारीत आराखडा** | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या, सीआरझेड व मॅग्रुव्ह सेलकडून ना हरकात प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या अधीन राहून **आराखडयास** |

PDF Compressor Free Version

| | | |
|---|---|---|
| | [illegible] लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२४-२५ | तत्वतः **मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.११ | **मौजे चिवटीबारी धबधबा (पिंपळनेर वनक्षेत्र) निसर्ग पर्यटन विकास, धुळे वनवृत्त**<br>आराखडा किंमत रु.६३४.०० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२४-२५ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहून तसेच चालू वर्षाच्या कामाकरीता प्रस्ताव सादर करणे व पुढील वर्षापासून डीपीडीसीकडून निधीची मागणी करणे. सर्व कामे तीन वर्षात पूर्ण करावीत अशा सूचनेसह **आराखड्यास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| २.१२ | **मौजे कर्जाळ गट नं.८५ जैवविविधता उद्यान व वनपर्यटन क्षेत्र, अक्कलकोट, सोलापूर, पुणे वनवृत्त**<br>आराखडा किंमत रु.२४७३.६९ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२३-२४<br>हे स्थळ अक्कलकोट, तुळजापूर व गाणगापूर या धार्मिक स्थळापासुन जवळच असल्याने येथे मोठ्या संख्येने पर्यटक येवू शकतात. येथे करावयाची सर्व कामे बांबूचा उपयोग करुन करण्यात येणार आहेत. | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहून व निधी डीपीडीसीतून उपलब्ध करुन घेणे तसेच अॅडव्हेंचर स्पोर्टमध्ये भाग घेणाऱ्यांच सुरक्षेकरीता आवश्यक ती उपाययोजना करावी व त्याकरीता महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाची परवानगीची आवश्यकता असल्यास ती प्राप्त करुन घ्यावी या सूचनेसह **आराखड्यास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| ३ | **सन २०२२-२३ करीताची सद्यस्थिती : सभेत माहिती देण्यात आली.** | |
| ४ | **सन २०१९-२० चे अंकेक्षण अहवाल पटलावर ठेवणेबाबत** : सर्वानुमते मंजूर. | |
| ५ | **मा.अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर उपस्थित होणारे विषय :** अध्यक्षांचे परवानगीने खालील निसर्ग पर्यटन स्थळांच्या विकास आराखड्यांचे सादरीकरण करण्यात आले. | |
| ५ (१) | **इंटरप्रिटेशन सेंटर, रामटेक, नागपूर वनवृत्त**<br>आराखडा किंमत रु.१०९९.०० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२३-२४<br>यासंबंधीचे सादरीकरण मुवसं (प्रा), नागपूर यांनी केले. रामटेक ऐतिहासिक व पर्यटकीय क्षेत्राचा विचार करुन हा प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याचे सांगितले. यामध्ये बांधकामाकरीता कोणताही खर्च येणार नसुन पर्यटकांना केवळ ऐतिहासिक बाबी अवगत करण्याकरीता चित्रे व इतर सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. तसेच प्रकल्पातील कामे ही सीईई, अहमदाबाद या संस्थेकडून करण्यात येतील. चालू वर्षात रु.१.५० कोटींची आवश्यकता नमूद केली. | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहून **आराखड्यास मान्यता प्रदान करण्यात आली.** चालू वर्षाकरिता निधी मागणी प्रस्ताव तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेसह सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. |

PDF Compressor Free Version

| | | |
|---|---|---|
| ५ (२) | **[illegible] पुणे वनवृत्त**<br>आराखडा किंमत रु.४७०.०० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२३-२४<br>पर्यटकांना विविध सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहे. या स्थळावर दररोज १ ते २ हजार व सुटीच्या दिवशी ३ ते ४ हजार पर्यटक भेटी देत असल्याचे सांगण्यात आले. चालु वर्षाकरीता रु.२.० कोटी उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आली. | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** चालु वर्षाकरिता निधी मागणी प्रस्ताव तांत्रीक व प्रशासकीय मान्यतेसह सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. |
| ५ (३) | **मौजे पानीव गट नं. २१९/२ ता. माळशिरस, जि. सोलापूर, पुणे वनवृत्त**<br>आराखडा किंमत रु.८६२.७० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२३-२५<br>रुपये ४.८० कोटी चालु वर्षी व ४.२३ कोटी पुढीलवर्षी मंडळाकडुन उपलब्ध करुन देण्याची विनंती केली. | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन व वन संवर्धन कायदा, १९८० अंतर्गत मंजुरी प्राप्त करुन घेवूनच कामे करावीत या सूचनेसह **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| ५ (४) | **मल्लिकार्जुन टेकडी निसर्ग पर्यटन केंद्र विकास, रोहा, ठाणे वनवृत्त**<br>आराखडा किंमत रु.५४०.५० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२५-२६ | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन व वन संवर्धन कायदा, १९८० अंतर्गत मंजुरी प्राप्त करुन घेवूनच कामे करावीत या सूचनेसह **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| ५ (५) | **मौजे पिपळे श्री हरेश्वर मंदीर पर्यटन विकास, भोर, पुणे वनवृत्त**<br>आराखडा किंमत रु.५१७.६३ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२४-२५<br>प्रस्तावातील क्षेत्र हे राखीव वन आहे. या क्षेत्रात पर्यटकांकरीता सुविधा निर्माण करण्याकरीता कामे करावयाची आहेत. तसेच हे क्षेत्र जेजुरी पासुन जवळ असल्याने याठिकाणी पर्यटक मोठया प्रमाणावर भेटी देतील, असे सांगण्यात आले. | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| ५ (६) | **बावधन वन उद्यान, पुणे वनवृत्त**<br>आराखडा किंमत रु.२९५.४२ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ (१ वर्षाकरीता)<br>हे उद्यान पुणे शहरातच असल्याने येथे पर्यटकांकरीता आधुनिक सोई सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. स्थळ शहरातच असल्याने येथे मोठया संख्येने पर्यटकभेटी देतील असे सांगण्यात | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन व निधी डीपॉझीट करुन प्राप्त करावा या सूचनेसह **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |

PDF Compressor Free Version

| | | |
|---|---|---|
| | आले | |
| ५ (७) | **मौजे वाडेगाव राखीव वन गट नं.८२८, ८३०, पुणे वनवृत्त**<br>आराखडा किमत रु.३४५.०० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२३-२४<br>हे राखीव वन असुन या क्षेत्रावर विविध पर्यटकीय सुविधा व क्षेत्रीय कामे करावयाची आहेत. या स्थळापासुन वाडेगोलाई देवी, धेऊर ही धार्मिक स्थळे असल्याने येथे पर्यटक मोठया संख्येने येतात. | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| ५ (८) | **मौजे धर्माबाद, वनउद्यान विकास, जि. नांदेड, औरंगाबाद वनवृत्त**<br>आराखडा किमत रु.१२३५.०० लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२३-२४<br>येथे उद्यान प्रस्तावित आहे, येथे वन विभागाची ९५४ हे. जागा असुन त्यापैकी १५ हे. जागेवर पर्यटकीय कामे करावयाची आहेत. या स्थळाजवळच सरस्वती मंदिर असल्याने येथे मोठया संख्येने पर्यटक भेटी देवू शकतात. | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहून व एकुण खर्चापैकी ६० टक्के निधी डीपीडीसीतून उपलब्ध करुन घ्यावा. उर्वरीत निधी मंडळाकडुन पुरविण्यात येईल या सुचनेसह **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| ५ (९) | **किल्ले मंडणगड सुशोभीकरण करणे, दापोली, कोल्हापूर वनवृत्त**<br>आराखडा किमत रु.५४९.७९ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२४-२५ | उपरोक्त अ.क. (१) ते (४) च्या अधीन राहुन व निधी डीपीडीसी कडून उपलब्ध करुन घेणे या अटीवर **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात आली.** |
| ५ (१०) | **मौजे मुरुमखेडा येथील इंदिरा गार्डन जागेत वन पर्यटन योजनेतंर्गत बेलदरी येथील Eco - Adventure Park. परभणी. औरंगाबाद वनवृत्त**<br>आराखडा किमत रु.११९२.९२ लक्ष<br>आराखडा कालावधी २०२२-२३ ते २०२४-२५<br>२९.३८ हेक्टर हे क्षेत्र सिंचन विभागाचे आहे तथापि त्यांचेकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे ते वन विभागास हस्तांतरीत करीत आहेत. सदरचे क्षेत्र परभणी पासुन ५० कि.मी. व हिंगोली पासून ५५ कि.मी. वर आहे. | उपरोक्त अ.क्र. (१) ते (३) च्या अधीन राहून व सिंचन विभागाकडुन जमीन हस्तांतरीत करुन घ्यावी व भारतीय वन अधिनियम कलम ४ अंतर्गत राखीव वनाचा प्रस्ताव तयार करावा व निधी डीपीडीसीतून उपलब्ध करुन घ्यावा या सूचनेसह **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली.** |

PDF Compressor Free Version

सभेच्या शेवटी व्यवस्थापकीय संचालक, निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांचे परवानगीने सभा संपन्न झाल्याचे जाहीर केले.

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

कार्यवृत्तांत प्र.मु.व.सं.(वबप्र) तथा
अध्यक्ष, का.स., मनिपविमं यांचेद्वारा मंजूर

PDF Compressor Free Version

परिशिष्ट-१

## दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या १७ व्या सभेमध्ये उपस्थितांची यादी

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | समितीमधील पद | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | डॉ. वाय. एल. पी. राव | अध्यक्ष | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| २ | श्री. प्रदीप कुमार | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ३ | श्री. महीप गुप्ता | सदस्य सचिव | व्यवस्थापकीय संचालक, मनिपर्विमं तथा सदस्य सचिव, मनिपर्विमं, कार्यकारी समिती, नागपूर |
| ४ | श्री. राजेश तिवारी | सदस्य | व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सी.एम, नागपूर यांचे प्रतिनिधी |
| ५ | श्री. प्रशांत सवाई | सदस्य | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे प्रतिनिधी |
| ६ | श्री. ए. आर. वाघमारे | सदस्य | मुख्य कार्यकारी अधिकारी (कॅम्पा) यांचे प्रतिनिधी |
| ७ | श्री. रंगनाथ नाईकडे | | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर |
| ८ | श्री. उमेश वर्मा | | उप महाव्यवस्थापक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |
| ९ | श्री. भारत सिंह हाडा | | उप वनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर |
| १० | श्री. केशव वाबळे | | उप वनसंरक्षक, नांदेड वनविभाग, नांदेड |
| ११ | श्री. नितीन कुमार सिंह | | उप वनसंरक्षक (प्रा.), धुळे वनविभाग |
| १२ | श्रीमती श्वेता बोड्डु | | उप वनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग |
| १३ | श्रीमती सरोज गवस | | उप वनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे वनविभाग |
| १४ | श्री. पी.के. खाडे | | विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वन प्रबोधिनी |
| १५ | श्री. लक्ष्मण आवारे | | सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो), सोलापूर वनविभाग, सोलापूर |
| १६ | श्री. एम.बी. चोपडे | | सहाय्यक वनसंरक्षक, ब्रम्हपुरी वनविभाग, ब्रम्हपुरी |
| १७ | श्री. पी.एस. मोडवान | | वनपरिक्षेत्र अधिकारी, भोकर, नांदेड वनविभाग |
| १८ | श्री. आर. आर. आहूजा | | Wildlife Biologist |

PDF Compressor Free Version

**V.C. ध्दारे सभेस उपस्थितांची यादी -**

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. बि.एस. हुडा | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर |
| २ | डॉ. व्ही. क्लेमेंट बेन | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई |
| ३ | श्री. एम. श्रीनिवास रेड्डी | संचालक, चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर |
| ४ | श्री. एस.व्ही. रामाराव | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे |
| ५ | श्री. एन.आर. प्रवीण | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे |
| ६ | श्री. एम. रामानुजम | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर |
| ७ | श्री. प्रकाश लोणकर | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), चंद्रपूर |
| ८ | श्री. दि. वा. पगार | वनसंरक्षक (प्रादेशिक), धुळे |
| ९ | श्री. सत्यजीत गुजर | वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद |
| १० | श्री. महादेव मोहीते | उपवनसंरक्षक (प्रादेशिक), सातारा |
| ११ | श्री. अप्पासाहेब निकत | उपवनसंरक्षक (प्रादेशिक), रोहा |
| १२ | श्री. राहुल पाटील | उपवनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे |
| १३ | श्री. धर्यशील पाटील | उपवनसंरक्षक (प्रादेशिक), सोलापूर |
| १४ | श्री. जी. गुरुप्रसाद | उपवनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर |
| १५ | श्री. दिपेश मल्होत्रा | उपवनसंरक्षक (प्रादेशिक), ब्रम्हपूरी |
| १६ | श्री.एन.एस. दिवाकर | उपवनसंरक्षक (प्रादेशिक), जव्हार |
| १७ | श्री. सचिन रेपाळे | उपवनसंरक्षक (प्रादेशिक), शहापूर |
| १८ | श्रीमती आशा भोंग | उप विभागीय वनअधिकारी, भोर |
| १९ | श्री. दिपक खाडे | विभागीय वनअधिकारी, चिपळूण |
| २० | श्री. ए. आर. जोशी | विभागीय वनअधिकारी, परभणी |
| २१ | श्री. सुहास पाटील | सहाय्यक वनसंरक्षक सह्याद्री व्या.प्र., कोल्हापूर |
| २२ | श्रीमती रामेश्वरी भोंगाडे | सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई |